"सी .के. टी. इंग्रजी माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल येथे  संस्कृत  दिन साजरा "

दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही  संस्कृत दिन   आज  सी . के.टी इंग्रजी माध्यमिक विद्यालयात साजरा करण्यात आला. संस्कृत हा विषय गेले कित्येक वर्ष  इयत्ता आठवी  ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शिकवला जातो .या विषयाबद्दल तसेच आपल्या परंपरेचा सन्मान वाढवा व संस्कृत भाषेचे संवर्धन , संरक्षण या हेतूने विद्यालयात  हा दिवस साजरा केला जातो. या संपूर्ण कार्यक्रमाची  जबाबदारी 8 वी ते 10 तील संस्कृत विषयाच्या विद्यार्थ्यांनी  पार पाडली . कार्यक्रमाची सुरुवात  संगीत शिक्षक रुपेश मढवी सर आणि विद्यार्थी वृंद यांच्या ईशस्तवन आणि स्वागत गीताने करण्यात  आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य , कथा कथन , भगवत गीता  श्लोक पठण , भगवत गीतेची रचना व वैशिष्ट्ये , आणि भगवद्गीता संमत शिक्षण प्रणाली यावर आधारित भाषणे तसेच ताणतणाव  व्यवस्थापनात भगवद्गीतेचे योगदान या विषयावर एक लघु नाटिका इत्यादींचे सादरीकरण करण्यात आले.ओम वाघ आणि श्रुती पवार या 10वीच्या  विद्यार्थ्यांनी पूर्णतः  संस्कृत मधून या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.संस्कृत विषयक विविध परीक्षा मधील प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिक व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे  म्हणून  सी के टी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. चव्हाण सर ,  सी.के.टी.इंग्रजी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. नीलिमा शिंदे मॅडम ,पर्यवेक्षिका सौ. नीरजा अदुरी मॅडम , इंग्रजी पूर्व प्राथमिकच्या पर्यवेक्षिका सौ. वैशाली पारधी , शिक्षक पालक संघाचे सदस्य सौ.प्रिया काशिद व सौ. अर्चना शिंदे  हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात इयत्ता 7वी चे  विद्यार्थी व वर्गशिक्षक  सहभागी झाले . आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. आभार प्रदर्शन व प्रास्ताविक संस्कृत शिक्षिका सौ. शाल्वी ठाकूर यांनी केले.


Changu Kana Thakur Vidyalaya
संस्कृत दिन
श्रावण पौर्णिमा